लोकसंख्येच्या ६५ टक्के लोकसंख्या ही ३५ वर्ष वयाच्या खालची आहे. जी जगातील इतर देशांच्या तुलनेत मोठी आहे. म्हणजेच भारत एक तरूण देश आहे. तरूण पिढीकडून देशाला खूप अपेक्षा आहेत. तरूणाला योग्य दिशा मिळाल्यास निश्चितच त्यांचे योगदान वाढून योग्य दिशेने वाटचाल होईल. आपल्या देशाचा कणा असलेल्या तरूण पिढीच्या खांद्यावर या देशाची धुरा आहे जी बदल, प्रगती आणि कल्पकता याची कास धरून पुढे जाऊ शकते. आपण जर इतिहासात पाहिले तर देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, मदनलाल धिंग्रा, चंद्रशेखर आझाद यांसारख्या तरूण क्रांतिकारकांचे महत्त्वाचे योगदान होते. स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजपर्यंत विविध क्षेत्रात तरूणांचे योगदान लक्षणीय आहे.

पण सध्याची परिस्थिती बघता, तरूण पिढीतील काही वर्गाची ऊर्जा चुकीच्या दिशेने, मार्गाला जाऊन भरकटलेली दिसते म्हणूनच शिक्षणाची आणि शिक्षकाची तरूणांना योग्य ती दिशादर्शन करण्याची मोठी जबाबदारी आहे. आजचा तरूणच उद्याची दशा आणि दिशा ठरवणार आहे. फक्त गरज आहे ती आजच्या तरूणाईला आदर्श विचारांची, कार्यकुशल नेतृत्वाची, दिशाहीन झालेल्या तरूणांना योग्य मार्गदर्शनाची. जर तरूणांचे योग्य प्रबोधन झाले नाही तर उद्याचे चित्र आजच्यापेक्षा अधिक भयंकर असेल. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी भारताच्या भविष्यातील विकासाची दिशा, त्यासाठी तरूणाईमध्ये सकारात्मकतेचा प्रसार व प्रत्यक्ष विधायक कृती करण्यास प्रेरणा देणारे चिंतन नेहमीच केले आहे. 'मिशन इंडिया' या त्यांच्या पुस्तकाचा पुढे 'विकसित भारत एक ध्येय' हा अनुवाद प्रकाशित करण्यात आला. त्यात विकसित भारताचं ध्येय गाठायचं असल्यास आपल्या क्षमतांचा पुरेपूर वापर करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली आहे. म्हणूनच त्याच्या वर्तमानकालीन स्थितीबद्दल, त्यांच्या अभिवृत्तींबद्दल विचार करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या अभिवृत्ती विकसित करण्यासाठी, त्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या अभिवृत्ती योग्य वेळेला, योग्य दिशेने वळविणे आवश्यक आहे. कोणत्याही राष्ट्राची, देशाची, समाजाची मोठी संपत्ती म्हणजेच विद्यार्थी. समाज, राष्ट्र, धर्म, यांचे भविष्य त्यांच्याच हातात असते. त्यांच्या अभिवृत्तीवरून राष्ट्राचे, समाजाचे, धर्माचे भविष्य निश्चित करता येते. देशाच्या, धर्माच्या विकासाची जबाबदारी या विद्यार्थ्यांची असते. विद्यार्थ्यांची प्रगती हीच समाजाची, देशाची प्रगती असते. कारण आजचा विद्यार्थी हा उद्याचा नेता, समाजसुधारक, वैज्ञानिक असेल. यासाठीच विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक, सामाजिक, राष्ट्रीय भावना सदोदित जागृत राहण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. भावी पिढी घडविणे, जागतिक नेतृत्व घडविणे, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय, सामाजिक, धार्मिक मूल्ये रूजविणे, त्या अभिवृत्ती निर्माण करणे शिक्षकाची जबाबदारी आहे. स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातील ऊजावान भारत साकार करण्यासाठी आजच्या युवकांच्या अभिवृत्ती योग्य दिशेला वळविणे शिक्षणक्षेत्रातूनच शक्य आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**

शिक्षण हे मनुष्यबळ विकासाचे प्रभावी साधन आहे.

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

AMIERJ

Volume–XII, Issue– I

Jan – Feb, 2023

OPEN ACCESS

Original Research Article

समाजाचा, राष्ट्राचा, देशाचा विकास व्हावयाचा असेल तर महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण होय. प्रसिद्ध शिक्षणतज्ञ नेल्सन मंडेला यांनी म्हटले आहे, Education is the most powerful weapon which you can use to change the world. यानुसार जग बदलायचे असेल, देशाचा विकास करायचा असेल, व्यक्तीला घडवायचे असेल तर ते शिक्षणातूनच होते. म्हणूनच माध्यमिक शिक्षणानंतर पुढे उच्च माध्यमिक शिक्षण घेताना मुलांना भविष्यातील त्यांचे चित्र दाखविण्याचे काम शिक्षणाच्या माध्यमातून व्हायला पाहिजे. या वयात त्यांच्या चांगल्या अभिवृत्ती निर्माण करून त्यांच्या शक्तीचा योग्य दिशेने वापर करता येईल. त्यासाठी त्यांना योग्य वेळी योग्य ते मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. जर असे झाले नाही तर हाच युवक त्याच्या शक्तीचा वापर चुकीच्या मार्गाने करू लागतो. बेरोजगार, रिकामी डोकी असलेला युवक देशाच्या प्रगती ऐवजी देश विघातक किंवा वाईट काम करण्यास प्रवृत्त होतो. वाईट मार्गाने पैसा कमावू लागतो. दे रे हरी पलंगावरी च्या वृत्तीनुसार आळसी बनलेल्या युवकांना काम न करता झटपट खूप पैसा मिळावा अशी अपेक्षा असते आणि त्यासाठी ते कोणतेही काम करायला तयार असतात. याचाच गैरफायदा काही लोक घेतात. देश विघातक कार्य करणारे लोक याचाच फायदा उचलतात. यामुळेच तर दहशतवादी किंवा नक्षलवादी बनण्यात युवकांची संख्या मोठी असण्यामागे हे कारण देखील आहे. हाताला काम नसल्यामुळे हे युवक वाईट व्यसनाच्या विळख्यात सापडतात. नको त्या गोष्टींमध्ये वेळ वाया घालवतात. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, मदनलाल धिंग्रा, चंद्रशेखर आझाद यांसारखी स्फूर्ती आजच्या युवकात दिसत नाही.

आज अनेक देशांच्या प्रगतीमध्ये युवकांचा सिंहाचा वाटा आहे. आपल्यालाही भारताला महासत्ता बनवायचे आहे. शाळा-महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समाज कामात सहभागी होत असेल. लोकांच्या सुख-दु:खाचे भान ठेवत असेल, समाजमूल्य व नैतिक मूल्यांचे पालन करून रचनात्मक व विधायक कामासाठी स्वतः झोकून देत असेल. संस्कृती व सांस्कृतिक मूल्यांचा आदर करीत असेल.तसेच राष्ट्रीय एकात्मता, अखंडता, बंधुता, धर्मनिरपेक्षता तो पाळत असेल तर तो खरा त्याचा शिक्षणातून झालेला विकास होय. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या या संदर्भातील अभिवृत्तींकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. अगदी पहिल्या इयत्तेपासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत या अभिवृत्तींकडे लक्ष देण्याची, त्यांचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. हे काम शिक्षकच चांगल्याप्रकारे करू शकतात. शाळा व महाविद्यालयात याबाबतची जबाबदारी चोख व प्रामाणिकपणे पार पाडली तर आजचे विद्यार्थी या महान व विशाल देशाचे जबाबदार व उच्च दर्जाचे नागरिक बनतील. विकसनशील भारताला एक महासत्ता बनविण्यासाठी युवकांचे योगदान महत्त्वाचे आहे. म्हणूनच युवकांना योग्य दिशा मिळण्यासाठी, त्यांच्या अभिवृत्ती जाणून घेणे महत्त्वाचे आहे. यासाठीच हे संशोधन महत्त्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या जीवन आणि मानवता विषयीच्या अभिवृत्तींचा अभ्यास करणे.

२. मराठी माध्यमातील आणि इंग्रजी माध्यमातील उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या जीवन आणि मानवता यांविषयीच्या
अभिवृत्तींचा अभ्यास करणे.

३. उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या देशाविषयीच्या अभिवृत्तीचा अभ्यास करणे.

४.मराठी माध्यमातील आणि इंग्रजी माध्यमातील उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या देशाविषयीच्या अभिवृत्तींचा अभ्यास करणे.

५. उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या धर्माविषयीच्या अभिवृत्तींचा अभ्यास करणे.

६. मराठी माध्यमातील आणि इंग्रजी माध्यमातील उच्च माध्यमिकस्तरीय विद्यार्थ्यांच्या धर्माविषयीच्या अभिवृत्तींचा अभ्यास करणे.

**परिकल्पना:**

१.विद्यार्थ्यांच्या जीवन आणि मानवता विषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय बदल दिसून आला नाही.

२. मराठी माध्यमातील आणि इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या जीवन आणि मानवता यांविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय फरक दिसून येत नाही.

३. विद्यार्थ्यांच्या देशाविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय बदल दिसून येत नाही.

४. मराठी माध्यमातील आणि इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या देशाविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय फरक दिसून येत नाही.

५. विद्यार्थ्यांच्या धर्माविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय बदल दिसून येत नाही.

६. मराठी माध्यमातील आणि इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या धर्माविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय फरक दिसून येत नाही.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :**

१. प्रस्तुत संशोधनात ठाणे शहरातील उच्च माध्यमिक स्तरीय शाळेचा समावेश केला असून हे उच्च माध्यमिक स्तरीय शाळेपुरते मर्यादित आहे.

२. उच्च माध्यमिक स्तरातील फक्त ११ वी च्या विद्यार्थ्यांचा समावेश केला आहे. १२ वीच्या विद्यार्थ्यांचा समावेश केलेला नाही, ११ वी च्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या जीवन आणि मानवता, देश तसेच धर्म या विषयीच्या अभिवृत्तींचा अभ्यास केला आहे.

४. प्रस्तुत संशोधन हे २०२१-२०२२ या वर्षात शिकणाऱ्या इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांचा समावेश केला असून हे संशोधन २०२१-२०२२ या वर्षात शिकणाऱ्या इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

५. प्रस्तुत संशोधन हे २०२१-२०२२ या वर्षात शिकणाऱ्या इयत्ता ११ वी च्या मराठी माध्यमातील आणि इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांचा समावेश केला असून हे संशोधन २०२१-२०२२ या वर्षात शिकणाऱ्या इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– I Jan – Feb, 2023

OPEN ACCESS Original Research Article

**संशोधन समस्या :**

**"उच्च माध्यमिक स्तरीय मराठी माध्यम आणि इंग्रजी माध्यम यांमधील विद्यार्थ्यांच्या जीवन, मानवता, देश व धर्म यांविषयीच्या अभिवृत्तींचा तुलनात्मक अभ्यास."**

**संशोधन नमुना :**

इयत्ता ११ वी HSC बोर्डाच्या एकूण १०० विद्यार्थ्यांची( ५० मराठी माध्यमातील विद्यार्थी आणि ५० इंग्रजी माध्यमातील विद्यार्थी) निवड करण्यात आली.

**संशोधन साधन:**

सदर संशोधनाकरिता टी.एस. सोधी यांनी विकसित केलेली अभिवृत्तीबाबतची 'Sodhi's Attitude Scale' चा उपयोग करण्यात येईल. या मापिकेमधील प्रश्नावलीमध्ये १.शिक्षक आणि पालक २. शिस्त ३. जीवन आणि मानवता ४. देश ५. धर्म असे ५ विभागांवर आधारित एकूण ७१ प्रश्न आहेत. त्यामध्ये जीवन आणि मानवता याविषयीच्या अभिवृत्ती मापनासाठी एकूण १९, देशाविषयीच्या अभिवृत्ती मापनासाठी एकूण १०, धर्माविषयीच्या अभिवृत्ती मापनासाठी एकूण २० असे एकूण ४९ प्रश्न आहेत.

**संशोधनाची पध्दती :**

प्रस्तुत संशोधनात उच्च माध्यमिक स्तरीय मराठी माध्यमातील आणि इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तींच्या संदर्भात सद्यस्थितीचा अभ्यास करावयाचा असल्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला.

**संशोधनाची कार्यवाही :**

प्रस्तुत संशोधनात उच्च माध्यमिक स्तरीय कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तींच्या संदर्भात सद्यस्थितीचा अभ्यास करावयाचा असल्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला. इयत्ता ११ वी HSC बोर्डाच्या एकूण १०० विद्यार्थ्यांची( ५० मराठी माध्यमातील विद्यार्थी आणि ५० इंग्रजी माध्यमातील विद्यार्थी) निवड करण्यात आली.

सदर संशोधनाकरिता टी.एस. सोधी यांनी विकसित केलेली अभिवृत्तीबाबतची 'Sodhi's Attitude Scale' चा उपयोग करण्यात आला आणि विद्यार्थ्यांची अभिवृत्ती मोजण्यात आली, त्यावरून निष्कर्ष काढण्यात आले.

**निष्कर्ष :**

प्रश्नावलीतील प्रश्नांच्या उत्तराव्दारा सर्व माहिती संकलित झाल्यानंतर मार्गदर्शक पुस्तिकेमध्ये दर्शविलेल्या प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याच्या गुणांची बेरीज स्कोअर सीटवर भरून, त्यानुसार सर्व विद्यार्थ्यांच्या प्रमाणित गुणांचा तक्ता तयार करण्यात आला. संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, T परीक्षिका या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करण्यात आला.

**तालिका**

| चार अभिवृत्ती | लिंग | संख्या | मध्यमान | एस.डी. | टी. मूल्य | अभिवृत्तीचा स्तरातील फरक |
|---|---|---|---|---|---|---|
| जीवन आणि मानवता | मराठी माध्यमातील विद्यार्थी | ५० | ४.०२ | २.८३ | ०.३५४ | लक्षणीय नाही |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | इंग्रजी माध्यमातील विद्यार्थी | ५० | ३.८० | ३.३६ | | |
| देश | मराठी माध्यमातील विद्यार्थी | ५० | ५.९८ | ५.८४ | ०.६९ | लक्षणीय नाही |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | इंग्रजी माध्यमातील विद्यार्थी | ५० | ६.७४ | ५.१६ | | |
| धर्म | मराठी माध्यमातील विद्यार्थी | ५० | १.४८ | ३.३६ | ३.२९ | लक्षणीय आहे |
| | इंग्रजी माध्यमातील विद्यार्थी | ५० | ३.७६ | ३. ५६ | | |

१.विद्यार्थ्यांची जीवन आणि मानवता यांविषयीच्या अभिवृत्ती सकारात्मक दिसून आली.

२.मराठी माध्यमातील आणि इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या जीवन आणि मानवता यांविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय फरक दिसून येत नाही.

३. विद्यार्थ्यांची देशाविषयीची अभिवृत्ती सकारात्मक दिसून आली.

४. मराठी माध्यमातील आणि इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या देशाविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय फरक दिसून येत नाही.

५. विद्यार्थ्यांची धर्माविषयीची अभिवृत्ती सकारात्मक दिसून आली.

६.मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांची धर्माविषयीच्या अभिवृत्ती ही इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीपेक्षा सकारात्मक दिसून आली.

**संदर्भग्रंथ सूची :**

१. कुंडले म.बा.(१९८४), शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्रीविद्याप्रकाशन, पुणे.

२. शैक्षणिक संशोधन पध्दती, भिंताडे, नित्य नूतन प्रकाशन, पुणे

३. आजचे शिक्षण आजच्या समस्या, पाटील लिला, कुलकर्णी विश्वंभर, श्रीविद्याप्रकाशन, पुणे-३०

४. जीवन शिक्षण (सप्टेंबर २००७), महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

५. पंडित ब. बि. (१९९७) शिक्षणातील संशोधन अभिकल्प, (द्वितीयावृत्ती), नूतन प्रकाशन, पुणे.

६. करंदीकर सुरेश(२००१), शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

७. पोखराकर, रजा (१९९९), संशोधनासाठी नमुना निवड, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक

८. Metha, R.S. 2003. Attitudes of College

Students towards certain problems. Applied Journal of Educational Research Studies.

९-.Agarwal J.C. (1966), Educational Research an Introduction, New Delhi: Arya Book Depot.

१०- Best John, J. W. (1985), Research in Education, Sixth Edition.

**Cite This Article:**

*** डॉ. काळे प्र. व जाधव म. स. , (2023).** *उच्च माध्यमिक स्तरीय मराठी माध्यम आणि इंग्रजी माध्यम यांमधील विद्यार्थ्यांच्या जीवन, मानवता, देश व धर्म यांविषयीच्या अभिवृत्तींचा तुलनात्मक अभ्यास,* ***Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XII (I) Jan-Feb, 59-65.***